PAGE NO.
DATE २२ / १२ /२०१७

# आय क्यु ए सी (IQAC) सभेची सुचना

आय क्यु ए सी (IQAC) समितीच्या सर्व सदस्यांना सुचित करण्यात येत आहे की IQAC समितीची सभा शनिवार दि. ३०/१२/१७ ला सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे तरी सर्व सदस्यांनी IQAC रुममध्ये सभेला उपस्थित राहावे.

**सभेचे विषय :-**

१. सप्टेंबर २०१७ मध्ये NAAC द्वारे आलेल्या महाविद्यालयाच्या मुल्यांकनावर चर्चा करणे.

२. सत्र २०१७-२०१८ मध्ये IQAC अंतर्गत महाविद्यालयीन गुणवत्ता वाढविण्याकरीता विविध उपक्रमांचे नियोजन करणे व मान्यता देणे.

३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे

Officiating Principal
Dr. Ambedkar College of Arts
Comm. & Science, Chandrapur

Dr. Ambedkar Arts Comm. & Sci. College, Chandrapur

Coordinator
IQAC
Dr. Ambedkar College of Arts
Comm. & Science, Chandrapur

IQAC समन्वयक
(डॉ. एन. एस. रामटेके)

१. डॉ. पी. एम. शेंडे
२. डॉ. के. डी. कुळसकर
३. डॉ. ए. एस. लांजे
४. डॉ. डी. एम. पिंपळशेंडे
५. प्रा. एम. टी. सोनटक्के
६. प्रा. एस. डी. बेले
७. प्रा. डी. जे. रामटेके
८. प्रा. बि. व्ही. अत्कुलवार

PAGE NO.
DATE / /

९. मान. कुणाल धोटेकर
१०. प्रा. एन. जी. रंगारी
११. श्री. सुनिल तामगाडे
१२. श्री. नितिन शेंडमाके

PAGE NO.
DATE 30/12/2017

## आयक्युएसी (IQAC) सभा

आज दिनांक 30-12-2017 ला सकाळी 10.30 वाजता आयक्युएसी (IQAC) समितीची सभा आपल्या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एम. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला खालील सदस्य उपस्थित होते.

| सभेला उपस्थित सदस्य | स्वाक्षरी |
|---|---|
| १. डॉ. पी. एम. शेंडे | [signature] |
| २. डॉ. एन. एस. रामटेके | [signature] |
| ३. डॉ. के. डी. कश्यकर | [signature] |
| ४. डॉ. ए. एस. लांजे | [signature] |
| ५. डॉ. डी. एम. पिंपळशेंडे | [signature] |
| ६. प्रा. एस. डी. बेले | [signature] |
| ७. प्रा. डी. जे. रामटेके | [signature] |
| ८. प्रा. बि. व्ही. अतकुलवार | [signature] |
| ९. प्रा. एन. जी. रंगारी | [signature] |
| १०. श्री. सुनिल तामगडे | [signature] |

### सभेचे विषय व ठराव

**विषय क्र. १ :-**
सप्टेंबर २०१७ मध्ये NAAC द्वारे आलेल्या मुल्यांकनावर चर्चा करणे.

**ठराव क्र. १ :-**
आपल्या महाविद्यालयाला दिनांक १५ व १६ सप्टेंबर २०१७ ला नॅक, बेंगलोर येथिल त्रिसदस्यीय नॅकसमितीने भेट देऊन पाहणी केली. या भेटीमध्ये त्यांनी विविध

PAGE NO.
DATE / /

धारकांसोबत (College Governing body, IQAC, Parents, Teachers, students, Almina) नियोजित वेळापत्रकानुसार चर्चा केली. व अंततः कॉलेजविषयी समाधान व्यक्त करीत मान. प्राचार्यांना आपला अहवाल बंद लिफाफ्यात सादर केला.

या मुल्यांकनानुसार आपल्या महाविद्यालयाला (NAAC, बेंगलोर द्वारे) B++ हा दर्जा देण्यात आला. त्यामुळे सर्व स्तरातुन कॉलेजचे अभिनंदन होत आहे. सदर दर्जा मिळाल्याबद्दल IQAC च्या सर्व समासदांनी कॉलेज प्रशासन, संस्थेचे अध्यक्ष आमु. अरूण धोटेकर, प्राचार्य, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त करण्यात येत आहे.

नॅक समितीद्वारे सादर करण्यात आलेल्या अहवालाचे वाचन Dr. A.S. Lanje सर यांनी केले. या अहवालात सुचविल्याप्रमाणे ग्रंथालयातील संदर्भ पुस्तके, जर्नल्स, तसेच बॉटनीकल गार्डन, शारीरिक शिक्षण विभाग, इत्यादी बाबींमधिल सुधारणा विषयी चर्चा करण्यात आली व मान. प्राचार्य अवस्थापनाशी सविस्तर चर्चा करतील असे ठरविण्यात आले.

नॅक समितीने सुचना केल्याप्रमाणे सुधारणा करण्याच्या दृष्टीने महाविद्यालय विकासाकरीता सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

PAGE NO.
DATE / /

विषय क्र. २ :
सत्र २०१७-१८ मध्ये IQAC अंतर्गत महाविद्यालयीन गुणवत्ता वाढविण्याकरीता नियोजन करणे व मान्यता देणे.

ठराव क्र. २ :
सत्र २०१७-२०१८ मध्ये महाविद्यालयीन गुणवत्ता वाढविण्याकरीता विविध समितींचे गठण सत्राच्या सुरवातीलाच IQAC समन्वयक, डॉ. के. डी. कथसकर यांच्या सुचनांनुसार मान. प्राचार्याद्वारा करण्यात आलेले आहे. त्यानुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे असे IQAC समन्वयक डॉ. एन. एस. रामटेके यांनी सुचविले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण गुणवत्ता वाढविण्यासाठी वर्षभरात विविध उपक्रम राबविण्यात यावे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल, तसेच सेमिनार, ग्रुप डिस्कशन, विविध प्रोजेक्टस अभ्यासक्रमात पावर पाईंट प्रेझेंटेशनचा वापर करावा, तसेच स्पर्धा परीक्षेकरीता प्लेसमेंट सेलच्या वतीने विविध कोचिंग क्लासेसचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करावे असे ठरविण्यात आले. तसेच प्राध्यापकांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध वर्कशाप, सेमिनार, चर्चासत्र आयोजित करण्यासाठी नियोजन करावे व प्राध्यापकांनी संशोधनाच्या गुणवत्तेवर भर द्यावा असे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य यांनी सुचविले. महाविद्यालयात सांस्कृतिक व क्रिडा क्षेत्रात अधिक काम करण्याची गरज लक्षात घेऊन सुविधा पुरविण्यात याव्यात असा ठराव पारीत करण्यात आला.
ठराव सर्वानुमते मंजूर.

Scanned with OKEN Scanner

PAGE NO.
DATE / /

विषय क्र. ३ :- मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठराव क्र. ३ :- मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर कोणतेही विषय चर्चेला आले नाही. त्यामुळे अध्यक्षांच्या परवानगीने ~~केळ~~ IQAC चे समन्वयक डॉ. एन. एस. रामटेके यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानुन अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाली असे जाहिर केले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभा अध्यक्षांची सही.

Officiating Principal
Dr. Ambedkar College of Arts
Comm. & Science, Chandrapur

Dr. Ambedkar Arts, Comm & Sci. College * Chandrapur

Scanned with OKEN Scanner